आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
शुक्रवार दिनांक १९ सप्टेंबर २०२५

<u>ठळक बातम्या</u>

1. पक्षापेक्षा इतर कामं महत्त्वाची वाटत असतील तर मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा-नागपूरच्या चिंतन शिबिरात अजित पवार यांचा इशारा.

2. AIIFA (एआयआयएफए) स्टीलेक्स 2025 स्टील महाकुंभाचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उदघाटन.

3. शालेय शिक्षणाला जागतिक दर्जा प्राप्त होण्यासाठी राज्य सरकार आणि केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस अँड असेसमेंट इंडिया यांच्यात सामंजस्य करार.

4. क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारात विदर्भातील ३० शिक्षकांचा समावेश.

<u>राष्ट्रवादी शिबिर-अजित पवार</u>

मंत्र्यांना शासन आणि पक्षाच्या कामापेक्षा इतर कामं महत्त्वाची वाटत असतील तर त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा असा इशारा देत पक्ष तळागाळापर्यंत पोहोचवावा असं आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं. ते आज नागपूर इथं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या चिंतन शिबिरात बोलत होते. राष्ट्रवादी काँग्रेस हा सर्वधर्मसमभाव मानणारा पक्ष आहे, आपला पक्ष महायुतीसोबत असला तरी पक्षाचा स्वतंत्र इतिहास आणि विचार आहे असं पवार म्हणाले. लोकांशी जोडून घेण्यासाठी पक्षातर्फे वर्षभर संवाद यात्रा आयोजित करण्यात येणार आहे, सर्व कार्यकर्त्यांनी लोकांमध्ये जाऊन पक्षाचे विचार आणि ध्येयधोरण यांचा प्रचार करावा असं पवार यांनी सांगितलं. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या चिंतन शिबिरात आज दिवसभर विविध विषयांवर चर्चा होणार आहे. चर्चेअंती ठराव मांडण्यात येणार असून हा ठराव नागपूर ठराव म्हणून स्वीकारला जाणार असल्याचेही अजित पवार यांनी सांगितलं.

<u>राष्ट्रवादी चिंतन शिबीर</u>

पक्षाची भविष्याची ध्येय धोरणे, वाटचाल, याचा रोडमॅप तयार करण्यासाठी चिंतन शिबीर आयोजित करण्यात आलं असून संघटन मजबूत करून आखलेल्या ध्येयय धोरणाची सरकारच्या माध्यमातून अंमलबजावणी करणे त्याचप्रमाणे पक्षात सर्वसमावेशकता आणणे हा याचा हेतू आहे असं प्रतिपादन राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, यांनी केलं. ते आज राष्ट्रवादीच्या नागपूर इथं आयोजित चिंतन शिबिरात बोलत होते. हे शिबीर

प्रामुख्याने स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी नाही हे  राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी स्पष्ट केलं

*स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपुरत नाही तर पुढच्या पिढीसाठी आहे आणि म्हणून तुम्ही सगळयांनी आजपर्यंतची जी शिबीर पाहिली त्यापेक्षा आजच शिबीर थोडास वेगळ्या पद्धतीचा आहे.*

<u>सेवापर्व</u>

सेवा आणि सुशासन या सूत्राच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार परिवर्तन आणि प्रगती घडवून आणण्यासाठी निरंतर प्रयत्नरत आहे. सेवा पर्वानिमित्त विशेष मालिकेत आजच्या भागात महिला सक्षमीकरणाच्या धोरणांविषयी जाणून घेऊ या.

*“गेल्या ११ वर्षांत सरकारनं सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि न्याय क्षेत्रात महिलांना सक्षम करण्यासाठी एक व्यापक, जीवनावश्यक धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. प्रत्येक महिलेला सन्मानाने, सुरक्षित आणि स्वावलंबी होण्यासाठी सक्षम करण्यावर सरकारने भर दिला आहे. हिंसाचार आणि भेदभावाविरुद्ध घटनात्मक संरक्षण आणि ऐतिहासिक कायदे, परिवर्तनकारी योजनांच्या माध्यमातून महिला विकास ते महिला नेतृत्वकेंद्रीत विकासाकडे सरकारने लक्ष पुरवले. गेल्या वर्षी हरियाणात विमा सखी योजनेची सुरुवात करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले....*

*लंबे समय तक हमारे देश में ऐसे अनेक काम थे जो महिलाओं के लिए वर्जित थे वहाँ महिलाएं काम कर ही नहीं सकतीं भाजपा की हमारी सरकार ने बेटियों के सामने से हर बाधा को हटाने की ठानी आज बड़ी बड़ी कंपनियों को हमारी बेटियां संभाल रही हैं। देश में किसानों के पशुपालकों के 1200 ऐसे उत्पादक संघ या सहकारी समितियां हैं, जिनका नेतृत्व महिलाएं कर रही हैं।*

*(बेटी बचाओ बेटी पढाओ योजनेचे अपेक्षित परिणाम दिसून येत आहेत. जानेवारी २०१५ मध्ये सुरू करण्यात आलेली सुकन्या समृद्धी योजना देशभरातल्या लाखो युवतींसाठी आशेचा आणि सक्षमीकरणाचा किरण ठरती आहे.सरकार लखपती दीदी उपक्रम देखील राबवत आहे, ज्याचा उद्देश बचतगटांच्या माध्यमातून महिलांना शाश्वत आधारावर दरवर्षी किमान एक लाख रुपये उत्पन्न मिळवून देणे हा आहे. प्रशासन, संरक्षण दल ते हवाई*

*वाहतूकिपर्यंत,  प्रत्येक क्षेत्रात महिला आता नेतृत्व करत आहेत आणि समावेशक आणि शाश्वत राष्ट्रीय विकासाला चालना देत आहेत.")*

सर्व क्षेत्रांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व निश्चित करण्यासाठी आणि त्यांना सक्षम करण्यासाठी केंद्र सरकार विविध उपक्रम राबवत आहे.

<u>कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान</u>
ट्रॅक्टर आणि इतर कृषी उपकरणांवर कमी करण्यात आलेल्या जी एस टी चा थेट लाभ शेतकऱ्यांना झाला पाहिजे, असं प्रतिपादन केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलं आहे. आज नवी दिल्लीत कृषी औजारं आणि उपकरणांची विक्री करणाऱ्या संस्था आणि संघटनांच्या प्रतिनिधींसमवेत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. कृषी औजारं आणि उपकरणांवरील जीएसटी १२ ते १८ टक्क्यांवरुन पाच टक्के इतका कमी केल्यामुळे ट्रॅक्टर आणि इतर उपकरणांच्या दरांमध्ये लक्षणीय घट होणार असल्याचं त्यांनी सांगितलं. ही घट २३ हजार ते ६३ हजार रुपयांपर्यंत असणार असून, याचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावा असं आवाहन त्यांनी या प्रतिनिधींना केलं.

<u>मुख्यमंत्री स्टिलेक्स</u>
महाराष्ट्राला केवळ स्टील क्षेत्रातच नाही तर ग्रीन स्टील क्षेत्रातही देशाचं सर्वोत्तम राज्य बनवायचं आहे, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. एआयआयएफए स्टीलेक्स २०२५ या स्टील महाकुंभाचं उदघाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आज मुंबई इथे झालं, त्यावेळी ते बोलत होते. पूर्वी नक्षलवादासाठी ओळखलं जात असलेलं गडचिरोली आता देशाची नवी स्टील सिटी होणार आहे. गेल्या दहा वर्षांत इथला माओवाद संपुष्टात आणला गेला असून स्थानिक समुदाय स्टील उद्योगाला पाठिंबा देत आहेत, असं त्यांनी सांगितलं. राज्यात आतापर्यंत सुमारे ८०,००० कोटींचे गुंतवणूक प्रकल्प स्टील क्षेत्रात आले असून, पुढील काळात महाराष्ट्र देशात स्टील उत्पादनात पहिल्या क्रमांकावर येईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी सरकारने ९ कंपन्यांशी ८० हजार ९६२ कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले.

<u>जीएसटी</u>
वस्तू आणि सेवाकर आता फक्त ५  टक्के आणि १८ टक्के अशा दोन स्तरात आकारला जाणार आहे.  यामुळे औषधांचे दर देखील कमी होणार आहेत. यासंदर्भात वृंदावन सिटी जामठा येथील औषध विक्रेते दत्तात्रय वैद्य यांनी प्रतिक्रिया दिली.  -

*भारत सरकारने आता जो जीएसटीमध्ये औषधावर जे आहे 12% पासून 5 पर्सेंटवर जीएसटी आलेले आहे. त्याच्यामुळे आता येत्या 22 तारखेपासून रेट्समध्ये नक्कीच कमी होईल. ग्राहकांना पेशंटना याचा भरपूर फायदा होईल. आमचा असा फायदा होईलच पण ग्राहकांना आणि पेशंटना भरपूर फायदा होईल.*

<u>सामंजस्य करार</u>

राज्य सरकार आणि केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस अँड असेसमेंट इंडिया यांच्यात आज मुंबईत सामंजस्य करार झाला. महाराष्ट्रात विद्यार्थी आणि शिक्षकांची संख्या मोठी असून केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस अँड असेसमेंट इंडियाकडे कौशल्य आहे. दोघांमधील सामंजस्य करार हा राज्यातल्या शालेय शिक्षणाला जागतिक दर्जा प्राप्त होण्यासाठी महत्वाचा ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. या सामंजस्य कराराअंतर्गत शिक्षकांसाठी विषयानुरूप प्रशिक्षण कार्यक्रम, राष्ट्रीय शिक्षण धोरणास अनुरूप आणि सीबीएसई-सुसंगत शैक्षणिक साधनसामग्री, आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्रे तसंच विद्यार्थ्यांसाठी 'क्लायमेट क्वेस्ट' सारखा हवामान शिक्षण कार्यक्रम आणि पूर्व- प्राथमिक अभ्यासक्रम केंब्रिज उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

<u>विजय वडेट्टीवार</u>

मराठा आरक्षणासंदर्भात हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याच्या सरकारच्या शासन निर्णयामुळे मराठवाडा पेटला असून, ओबीसी समाजात अस्वस्थता वाढत असल्याचा आरोप काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते.

<u>मंत्री मंगलप्रभात लोढा</u>

कौशल्य विकास ही देशाच्या प्रगतीची किल्ली असून यात राष्ट्रीय आणि आंतरराज्य कौशल्य विकासातील यशोगाथेची  प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी सुसंवाद, समन्वय आणि एकात्मता असणे ही काळाची गरज आहे असं प्रतिपादन कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केलं. राज्य आणि केंद्र सरकारमध्ये राज्यांनी आपापसात अधिक सुसंवाद ठेवून 'टीम इंडिया' म्हणून कार्य करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत २०४७ च्या स्वप्नाला साकार करू या, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

शिक्षक गुणगौरव पुरस्कार

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण आणि  क्रीडा विभागाच्या वतीने २०२४-२५ चे क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार घोषित करण्यात आले आहेत. विविध सात विभागात राज्यभरातील एकूण १०९ शिक्षकांच्या नावांची पुरस्कारासाठी शिफारस करण्यात आली आहे. यात विदर्भामध्ये प्राथमिक आणि माध्यमिक गटात प्रत्येकी ११ शिक्षकांना, आदिवासी क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या सात शिक्षकांना आणि विशेष शिक्षक क्रीडा विभागात अकोला जिल्ह्यातील सहदेवराव भोपळे विद्यालयाचे संतोष कुमार राऊत यांना पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. दिनांक २२ सप्टेंबर रोजी मुंबईत आयोजित  कार्यक्रमात पुरस्कार प्रदान केले जातील.

सेवा पंधरवाडा उपक्रम

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत राबविण्यात येत असलेल्या सेवा पंधरवाडा उपक्रमात आज गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन इथं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि राज्यमंत्री तसेच जिल्ह्याचे सहपालकमंत्री **ॲ**ड.आशिष जयस्वाल यांनी थेट नागरिकांची निवेदने स्वीकारून त्यांच्या तक्रारी जाणून घेतल्या. यावेळी अनेक तक्रारींचे निवारण जागेवरच करण्यात आले.

आशिया करंडक क्रिकेट

आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना ओमानशी होणार आहे. अबूधाबीच्या शेख झायेद मैदानावर रात्री आठ वाजता हा सामना सुरू होईल

हवामान

येत्या काही तासांत चंद्रपूर आणि यवतमाळ इथं विजांच्या कडकडाटासह वादळाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.  उर्वरित विदर्भात देखील हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. दरम्यान, नागपूर जिल्ह्यात मागील काही दिवसांत होत असलेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील बहुतांश जलप्रकल्प 100% भरले आहेत. जिल्ह्यातील मोठे, मध्यम आणि लघु अशा एकूण 77 जल प्रकल्पांमध्ये सरासरी 99% इतका जलसाठा आहे.

******